# १८. प्रश्न

आज पेपरात छोटीशी बातमी होती. ती बातमी वाचून बरेच प्रश्न मनात पिंगा घालू लागले. तसे तर आयुष्यच म्हणजे मोठे प्रश्नचिन्ह आहे. Auditor असल्यामुळे कोणतेही काम प्रश्नांनीच संपते. बातमी खालीलप्रमाणे होती.

महाराष्ट्र टाइम्स २५.२.२००६

बारावीच्या परिक्षेसाठी एक मुलगा जात होता. चार गुंडांनी गाडीतून येऊन मुलाला पकडले व गाडीतून लांबवर घेऊन गेले व पैशांची मागणी केली. मुलाकडे पैसे नसल्यामुळे त्यांनी त्याच्या डोक्यात खिळे ठोकले व त्याला गाडीतून फेकून दिले. जखमी अवस्थेत तो मुलगा परिक्षाकेंद्रावर आला व पोलीसांनी त्याला हॉस्पीटलला ॲडमिट केले. जास्त जखमांमुळे त्याला केईम ला नेण्यात आले. ही बातमी वाचून मला बरेच प्रश्न पडले.

१. हे चोर पेशाने चोर होते का ?

२. असल्यास त्यांनी मुलाला का पकडले ?

३. मुलाकडे पैसे मिळण्याची शक्यता किती ?

४. पैसे मिळाले नाही तर मुलाला जखमी का केले ? असेच सोडून का दिले नाही ?

५. मुलाला दोन थोबाडीत मारता आल्या असताना खिळे डोक्यात मारायची गरज काय ?

६. खिळे घेऊन निघाले होते का रस्त्यातले घेतले ?

७. विरोधकांसाठी राजकीयदृष्ट्या हा कायदा आणि शांतीचा प्रश्न आहे. मुलाशी काहीच देणे घेणे नाही ?

दुसरी बातमी ः

आरोपी स्त्रीला जन्मठेपेची शिक्षा दिल्यानंतर तीने बाथरूम मधून उडी मारून आत्महत्या केली.

शिक्षा सांगितल्यानंतर आरोपीने बाथरूमला जाण्यासाठी पोलीसांची परवानगी घेतली व बाथरूममध्ये शिरताच उघडया खिडकीतून उडी मारली. पोलीसांना निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली.

प्रश्न ?

१. पोलीसांनी बाथरूमच्या खिडकीला गज नाहीत हे बघितले होते का ?

२. बाथरूमची खिडकी बघितली असल्यास आरोपी उडी मारण्याची शक्यता वाटली का ?

३. आरोपीने आत्महत्या करावयाचे आधीच ठरविले होते का तो एक आयत्या वेळेचा निर्यण होता ?

४. सर्वात महत्वाचा प्रश्न कि उच्च न्यायालयाच्या बाथरूमची एव्हढी वाईट अवस्था का?

५. ह्या खिडकीतून होणारी ही पहिलीच आत्महत्या होती का ?

६. खिडकी मुद्यामच गजाशिवाय ठेवली होती का की आरोपींना पळणे सोपे जावे ?

७. ही खिडकी दुरूस्त केली का ?

८. शिक्षा पोलीसांना दिली ती बरोबर होती का ? शिक्षा ज्या ऑफीसरकडे उच्च न्यायालयाच्या इमारतीची देखभाल सोपविली होती त्याला देण्याची गरज होती ?

मित्रानो तुम्हाला असे प्रश्न पडतात का ? अशा प्रश्नाचा मागोवा घेण्यात मीडीयाला रस का नसतो ? परत एक प्रश्न ?